लोकमत

# ‘जेडीआयईटी’च्या आठ विद्यार्थ्यांची गुजरातच्या बहुराष्ट्रीय कंपनीत निवड


मोहन माडीवाल


ओंकार गावंडे


दुष्यंत चौधरी


समीर अंकर


पवन हनुमंते


वैभव रंगारी


नितेशकुमार सोनी


सुयोग डोंगरे

लोकमत न्यूज नेटवर्क

**यवतमाळ** : जवाहरलाल दर्डा एज्युकेशन सोसायटी संचालित येथील जवाहरलाल दर्डा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या आठ विद्यार्थ्यांची रिलायन्स इंडस्ट्रीज लि. (हजिरा, गुजरात) या बहुराष्ट्रीय कंपनीत निवड झाली आहे. सत्र २०२१-२२ मध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांनी व्हर्च्युअल कॅम्पस ड्राईव्हच्या माध्यमातून हे यश मिळविले.

सर्वप्रथम विद्यार्थ्यांची ऑनलाईन ॲप्टिट्यूड टेस्ट घेण्यात आली. पहिल्या फेरीतून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या टेक्निकल इंटरव्ह्यू व पर्सनल इंटरव्ह्यूच्या फेऱ्या घेण्यात आल्या. या संपूर्ण प्रक्रियेतून टेक्सटाईल इंजिनिअरिंग शाखेतील मोहन माडीवाल, ओंकार गावंडे, मेकॅनिकल इंजिनिअरिंग शाखेचे दुष्यंत चौधरी, समीर अंकर, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग शाखेचे पवन हनुमंते, वैभव रंगारी आणि केमिकल इंजिनिअरिंग शाखेचे नितेशकुमार सोनी, सुयोग डोंगरे या विद्यार्थ्यांची अंतिम निवड करण्यात आली.

पॉलिस्टर टेक्सटाईल इंजिनिअर ट्रेनी या पदावर त्यांची निवड झाली असून पाच लाख ५० हजार रुपयांचे वार्षिक पॅकेज घोषित करण्यात आले आहे. रिलायन्स इंडस्ट्रीज लि. ही कंपनी फॉर्च्यून मॅगझिन युनायटेड स्टेटच्या ५०० सर्वात मोठ्या कार्पोरेशनच्या वार्षिक रँकिंगमध्ये सुचीबद्ध आहे. अशा या नामांकित कंपनीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयातर्फे कौतुक करण्यात आले.